# कृषि विभाग, जिल्हा परिषद पालघर
# जिल्हा परिषद सेस फंड योजना

- **५०% अनुदानाने शेतकऱ्यांना सुधारित कृषि अवजारे पुरवठा**
  शेतात लागवड होणा-या पिकांवर मजुरीच्या खर्चात व वेळेची बचत करणारी विविध सुधारित कृषि अवजारे नसल्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होत नाही. म्हणूनच शेतक-यांना अनुदानाने सुधारित कृषि अवजारे खरेदीकरीता अनुदान उपलब्ध करुन देणे. शेतक-यांच्या उत्पादनात वाढ करणे.

- **बचत गटांना ९०% अनुदानाने शेती व्यवसायास चालना देणे.**
  1. लहान शेतकऱ्यांना शेतीची कामे वेळेत करीण्याकरीता भाडेतत्वावर नाममात्र दरात शेतीची औजारे उपलब्ध करुन देणे.
  2. सदर औजारांच्या भाडयापोटी येणाऱ्या रक्कमेमुळे संघास एक शाश्वत आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे.

  **पात्रतेचे निकष**
  1. बचत गट / ग्रामसंघाची आर्थिक उलाढाल र. रु. 1.00 लक्ष पेक्षा अधिक असावी.
  2. बचत गट / ग्रामसंघाचे स्वतंत्र बँक खाते असावे.
  3. बचत गट / ग्रामसंघाचे लेखे अद्ययावत आसावे.
  4. बचत गट /ग्रामसंघाच्या मासिक व सर्वसाधारण बैठका नियमित घेण्यात आलेल्या असाव्यात त्यांची नोंद इतिवृत्त नोंद वहीत असावी.
  5. गटांना दिलेल्या कर्जाची नियमित परत फेड केलेली असावी.

  बचत गट/ ग्रामसंघाच्या कार्यक्षेत्रात भात लागवडी खालील क्षेत्र अधिक असावे अथवा भात लागवडी साठी वाव असावा.

- **शेतकऱ्यांना ताडपत्री पुरवठा**
  ताडपत्रीचा उपयोग शेतक-यांना धान्य सुकविणे, मळणीकामी जागा तयार करणे, अवेळी पावसापासून कापणी झालेल्या पिकाचे संरक्षण करणे आदी कामांकरिता होतो. म्हणूनच शेतक-यांना ताडपत्री खरेदीकरीता अनुदान उपलब्ध करुन देणे. शेतक-यांच्या उत्पादनात वाढ करणे.

- **५० % अनुदानाने शेतीसाठी पंपसंचाचा अनुदानाने पुरवठा करणे**
  शेतात लागवड होणा-या पिकांकरिता संरक्षित पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होते. म्हणूनच शेतक-यांना अनुदानाने डिझेल/ पेट्रोडिझेल, विद्युत पंपसंच इ. खरेदीकरीता अनुदान उपलब्ध करुन देणे.

- **शेतक-यांना ५० % अनुदानान‍े कडबाकुटटी यंत्राचा पुरवठा करणे**
  शेतकऱ्यांच्या शेतावर मोठया प्रमाणात पेंढा, कडबा व गवताचे उत्पादन होत असते. वैरणीचे लहान लहान तुकडे करणे जनावरांच्या पचनाच्या दृष्टीने गरजेचे आहे. त्यामुळे योजनेतुन त्यांना कडबाकुट्टी यंत्र खरेदीकरीता अनुदान दिल्यास त्याचा उपयोग पेंढा व गवताची कुटटी करुन शेतकरी स्वत:कडील जनावरांसाठी व इतर पशुपालकांना कुट्टी देऊन त्यांचा आर्थिक फायदा होईल. तसेच मनुष्यबळ व वेळेची बचत होईल. हा या योजनेचा उद्देश आहे.

- **बायोगॅस बांधणीकरीता पुरक अनुदान देणे**
  बायोगॅस संयंत्र बांधकामासाठी रेती, सिमेंट, पाईप लाईन, वाळू, शेगडी, बांधकाम
  बायोगॅस संयंत्र बांधकामासाठी रेती, सिमेंट, पाईप लाईन, वाळू, शेगडी, बांधकाम मजूरी इत्यादीचा खर्च जास्त येत असून सयंत्र धारकांना सदर खर्च परवडत नाही याकरिता केंद्र पुरस्कत राष्ट्रीय बायोगॅस योजने अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना पुरक अनुदान देणे

- **शेतक-यांना ५० % अनुदानाने बियाणे संच पुरवठा करणे**
  निरनिराळ्या पिकांचे सुधारित व संकरित बियाणे शेतक-यांना 50% अनुदानाने उपलब्ध करुन देणे तसेच परसबागेसाठी मिनिकिट उपलब्ध करुन देणे. बियाणे बदलाचा दर वाढविणे .शेतक-यांच्या उत्पादनात वाढ करणे. शेतीसाठी जैविक खते उपलब्ध करुन देणे.

- **अपंग शेतक-यांना 90% अनुदानाने कृषि साहित्याचा पुरवठा करणे**
  अपंग शेतक-यांना कृषि साहित्याचा लाभ देणे, अपंग शेतकरी स्वतः व त्याचे कुटुंबातील सदस्य यांनी त्याचा शेतीसाठी त्याचा वापर करणे. त्यामुळे या लाभार्थ्यांना स्वंयरोजगाराची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना स्वावलंबी बनविणे व त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, आर्थिक दृष्टया सक्षम बनविणेअपंग व्यक्ती (समानसंधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995 कायदयाची अंमलबजावणी करणे.

- **शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्याची योजना**
  राज्यातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास प्रोत्साहन, सेंद्रिय शेतीवर आधारित प्रशिक्षण व प्रात्यक्षिके घेणे, शेतकऱ्यांच्या शेतावर सेंद्रिय शेती निविष्ठा तयार करणे व पुरवठा करणे करीता अनुदान देणे, सेद्रिय उत्पादन प्रदर्शनांमार्फत सेंद्रीय शेतीमालाच्या विक्री व व्यवस्थापनास चालना देणे.

- **शेतकऱ्यांना फुलशेतीसाठी अर्थसहाय्य योजना**

1) सामुहिक पध्दतीने फुल शेती लागवडीस चालना दणे.
2) शेतक-यांच्या शेतावर सामुहिक पध्दतीने फुल पिकांची लागवड करून शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करणे व याद्वारे शेतक-यांचे स्थलांतर रोखण्यासाठी मदत करणे व त्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे हा आहे.

- **बचत गटांना शेती माल विक्रीसाठी वाहतुक अर्थसहाय्य**
  बचतगटांनी तयार केलेला माल वाहतुकीस येणारा खर्चासाठी पडुन न राहता निर्धारीत वेळेत त्याला विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करुन त्यांचे उत्पन्न वाढविणे.

- **५०% अनुदानाने शेतक-यांना पीक संरक्षण अवजारे पुरवठा**
  शेतात लागवड होणा-या पिकांवर निरनिराळया किडरोगांचा प्रार्दुभाव होतो. मात्र किटकनाशक फवारणी करिता स्प्रेपंप नसल्याने शेतकरी फवारणी करु शकत नाहीत. शेतक-यांना पिक संरक्षण अवजारे खरेदीकरीता अनुदान उपलब्ध करुन देणे. शेतक-यांच्या उत्पादनात वाढ करणे.

- **५०% अनुदानाने स्वयंचलित कापणी व मळणी यंत्रे शेतकऱ्यांना पुरवठा करणे**
  भात लागवड मध्ये होणारा मजुर खर्च कमी करणारी व वेळेची बचत करणारी स्वयंचलित कापणी व मळणी यंत्रांसारखी सुधारित कृषि अवजारे नसल्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होत नाही. म्हणूनच शेतक-यांना भात मळणी यंत्र खरेदीकरीता अनुदान उपलब्ध करुन देणे.

# जिल्हा वार्षिक योजना

- **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत - क्षेत्राबाहेरील)**
  आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पनात वाढ करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची सिंचन प्रधान योजना असुन, सदर योजनेअंतर्गत आदिवासी शेतकरी बांधवाना नवीन विहीर, जुनी विहीर, तसेच शेततळयाचे प्लास्टीक  अस्तरीकरण या घटकासह इनवेल बोरींग, पंपसंच, वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच, प्लास्टिक पाईप तसेच परसबाग इ.बाबीचा लाभ देय आहे.

- **डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना**
  अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांच्या उत्पनात वाढ करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची सिंचन प्रधान योजना असुन, सदर योजनेअंतर्गत अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकरी बांधवाना नवीन विहीर, जुनी विहीर, तसेच शेततळयाचे प्लास्टीक  अस्तरीकरण या घटकासह इनवेल बोरींग, पंपसंच, वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच, प्लास्टिक पाईप तसेच परसबाग इ.बाबीचा लाभ देय आहे.

- **गुणनियंत्रण**
    1) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचककडे खरीप रब्बी व उन्हाळी हंगामाची बियाणे, खते मागणी नोंदवणे व त्याप्रमाणे नियोजन करणे
    2) जिल्हयातील उत्पादक, वितरक व विक्रेते स्तरावर निविष्ठाचे (बियाणे, किटकनाशक व रासायनिक खते) नमुने काढणे, त्यांचे विश्लेषण करणे व अप्रमाणीत नमुन्यांवर पुढील न्यायालयीन प्रक्रीया पार पाडणे.
    3) कृषि सेवा केंद्राची नियमीत तपासणी करून दिलेल्या परवान्यासंदर्भात कायदयाचे उल्लघंन होत असल्यास प्राथमिक कारवाई करणे
    4) उत्पादक, वितरक व विक्रेत्याकडील उत्पादन साठवणुक केंद्र, कृषि सेवा केंद्राचे गोडाऊन तपासणी इत्यादी कामे करणे.
    5) कायदेशीर बाबीचे उल्लंघन झाल्यास संबंधीत निविष्ठा अनधिकृत, बोगस व अप्रमाणीत निविष्ठा संदर्भात विक्री बंद आदेश देणे, जप्ती करणे तसेच पोलीस केसेस करणे.